**महाराष्ट राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. १९/२०१३** **दि. १८.०५.२०१३**

| | |
|---|---|
| १) श्री. अनंत तुकाराम सिनकर.<br>मु.पो. भालावळी,<br>ता. राजापुर, जि. रत्नागिरी | तक्रारदार ग्राहक |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता, महावितरण<br>स व सुं विभागीय कार्यालय<br>रत्नागिरी. | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. डि. एस्. जामखेडकर<br>अध्यक्ष<br>२) श्री. व्ही. बी. जगताप<br>कार्यकारी अभियंता व सचिव |
| ग्राहकाच्या वतीने | श्री. अनंत तुकाराम सिनकर |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | १) श्री. ओंकार कि. बारापात्रे<br>उपकार्यकारी अभियंता रत्नागिरी विभाग.<br>२) श्री. अशोक वाय. कोंडगुळे<br>सहाय्यक अभियंता रत्नागिरी विभाग. |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

ग्राहक श्री. अनंत तुकाराम सिनकर, मु.पो. भालावळी, ता. राजापुर जि. रत्नागिरी यांचा तक्रार अर्ज अनुसुची 'अ' मध्ये आवश्यक त्या तपशीलासह दि. १५.०५.२०१३ रोजी दाखल झाला आहे. तक्रार दाखल होताच मंचाकडील पत्र क्र. १११ दि. २०.०५.२०१३ च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, रत्नागिरी यांच्याकडे तक्रार संदर्भात आवश्यक ते स्पष्टिकरण आणि खुलासा मागितला असता ते दि. ४ जुलै २०१३ रोजी मंचाकडे सादर करणेत आले आहे. आयोगाच्या नियमावलीनुसार तक्रार प्रकरणासंदर्भात सुणावनीची नोटीस काढण्यात येवून तक्रार प्रकरणाची सुनावणी १८ जुन २०१३ रोजी निश्‍चित केली होती पण कार्यकारी अभियंता रत्नागिरी यानी रत्नागिरी परिसरात वादळ व पाऊस यामुळे सर्वत्र वीज वाहिन्यांची पडझड झालेली असून दि. १८.०६.२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहण्यास असमर्थता व्यक्त केली त्यामुळे पुन्हा दि. ०९.०७.२०१३ रोजी सुनावणीची तारीख निश्‍चित केली. सदर सुनावणीस उभय पक्षानी उपस्थित राहून आपला युक्तीवाद केला.

ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप असे की, अनंत तुकाराम सिनकर यांनी कृषीपंप विद्युत जोडणी करीता दि. २१.०१.२०१२ रोजी अर्ज केला असुन सदरहु अर्जास महावितरणच्या राजापुर कार्यालयाचे कार्यालयीन पत्र क्र. १३९ दि. २७.०१.२०१२ नुसार अर्जाच्या त्रुटीबाबत कळविले असता संबंधित ग्राहकाने दि. ०४.०२.२०१२ रोजी कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. अर्ज आणि अनुषंगिक पुर्तता केल्यानंतर आवश्यक तो पाठपुरावाही करण्यात आला. तथापि, १७ महिन्याचा कालावधी उलटल्यानंतरही महावितरणकडुन पुढील कोणतीच कृती न झाल्याने मंचाकडे तक्रार दाखल करण्यात आली. केलेल्या अर्जानुसार कृषीपंप विद्युत जोडणी तातडीने देण्याविषयी मागणी करण्यात आलेली आहे. विलंबाच्या अनुषंगाने कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक ते आदेश देण्यात यावेत अशीही मागणी ग्राहकाने केलेली आहे.

महावितरणने सादर केलेल्या स्पष्टीकरणामध्ये नमुद केले आहे की तक्रारदारानी आपल्या मौजे भालावळी येथील वीज पंपाचे कनेक्शन मिळण्यासाठी दि. २१.०१.२०१२ रोजी अर्ज केला आहे पण सदर अर्जामध्ये काही त्रुटी असल्यामुळे ग्राहकास त्रुटींची पुर्तता करण्यास कळविले होते. त्रुटींची पुर्तता झाल्यानंतर दि. २३.०४.२०१३ रोजी वीज कनेक्शनचा प्रस्ताव शाखा कार्यालयाकडून उपविभागीय कार्यालयाकडे सादर करण्यात आला, पण सदर प्रस्तावामध्ये त्रुटी असल्यामुळे त्या त्रुटी दूर करुन दि.१९.०६.२०१३ रोजी विभागीय कार्यालयाकडे अंदाजपत्रक मंजूरी साठी सादर करण्यात आले. सदर अंदाजपत्रक दि. ०२.०७.२०१३ रोजी मंजूर करण्यात आले असून कोटेशन देण्यात आलेले आहे हे कनेक्शन देण्यासाठी एकूण सहा पोल लघुदाब वाहीनीची आवश्यकता आहे. कोटेशनची रक्कम भरल्यानंतर व आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर जेष्ठता यादी प्रमाणे कनेक्शन देण्यात येईल.

सुनावणी दरम्यान तक्रारदार श्री. अनंत तुकाराम सिनकर यानी आपल्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केले की, दि. १९.०१.२०१२ रोजी कनेक्शन साठी अर्ज केल्यानंतर दि. २७.०१.२०१२ कागदपत्रांची पुर्तता करण्याविषयी महावितरण कडून कळविण्यात आले त्यानंतर एकाच आठवडयात म्हणजे दि.०४.०२.२०१२ रोजी योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे त्यानंतर मात्र वेळोवेळी महावितरणच्या वेगवेगळया कार्यालयाकडे पाठपुरावा केला पण एप्रिल २०१३ पर्यंत सर्व्हे देखील करण्यात आला नाही. पंपाच्या कनेक्शनसाठी पाच ते सहा ठिकाणाहून कनेक्शन घेता येते पण जिथून सहा पोल लागतात तिथून सर्व्हे केला आहे. दि. ०४.०७.२०१३ रोजी कोटेशन मिळाले आहे,त्यानुसार मी लागलीच पैसे पण भरणार आहे पण कोटेशन मिळण्यासाठी दीड वर्षाचा कालावधी लागला तर कनेक्शन मिळण्यासाठी किती कालावधी लागेल हे सांगता येत नाही. त्यामुळे माझे कनेक्शन ताबडतोब मिळावे.

महावितरणच्यावतीने श्री. अशोक कोंडगुळे सहाय्यक अभियंता विभागीय कार्यालय रत्नागिरी यानी युक्तीवाद करताना स्पष्ट केले की तक्रारदारानी नमुद केल्या प्रमाणे सदर कनेक्शनची मंजूरी व कोटेशन देणे करीता वेगवेगळया स्तरावर विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती रास्त आहे त्यामुळे जेष्ठता यादीचा विचार न करता डिसेंबर २०१३ पर्यन्त वीजवाहिनी तयार करण्यात येईल व त्यानंतर तक्रारदाराकडून चाचणी अहवालाची मागणी करण्यात येईल. चाचणी अहवाल प्राप्त होताच विनाविलंब कनेक्शन देण्यात येईल.

सदर प्रकरणामध्ये दाखल झालेली कागदपत्रे व उभय कक्षाकडून सुनावणी दरम्यान करणेत आलेला युक्तीवाद यांचा अभ्यास करता ग्राहकाची तक्रार रास्त असून महावितरणने वीजजोडणी कार्यवाही तातडीने केली पाहिजे असेच मंचाचे स्पष्ट मत आहे. तक्रारदारानी आपल्या वीज कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर हया कनेक्शनच्या मंजूरीसाठी वेगवेगळया स्तरावर उशीर झालेला आहे व ही वस्तुस्थिती महावितरणने मान्य केलेली आहे त्यामूळे मुळातच कोटेशन देणे करीता दिड वर्षाचा कालावधी लागलेला असल्याने कनेक्शन देण्यासाठी पुन्हा जेष्ठता यादी इत्यादी बाबींचा विचार करणे योग्य होणार नाही असा मंचाचा निष्कर्ष आहे. महावितरणने देखील सुनावणी दरम्यान या बाबीस मान्यता दिली असून डिसेंबर २०१३ पर्यन्त वाहीनी तयार करणेत येईल अशी हमी दिलेली आहे. तक्रारदारानी खर्च व अनुषंगिक बाबी करीता कोणतीही मागणी केलेली नाही त्यामुळे तक्रारप्रकरणात झालेला खर्च नुकसान भरपाई तसेच विलंबाबत दंड इत्यादी बाबी करीता विचार करण्यात आलेला नाही .

मंचाच्या वरील निष्कर्षानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.तो महावितरणवर बंधनकारक राहील.

## आदेश

**१) ग्राहकाची तक्रार मान्य करण्यात आली आहे.**

**२) महावितरणने हमी दिल्यानुसार वीजपंपाचे कनेक्शन देण्यासाठी लागणारी वीजवाहीनी डिसेंबर २०१३ पर्यन्त तयार करावी व चाचणी अहवाल इत्यादींची पुर्तता झालेनंतर एका आठवडयामध्ये**

**कनेक्शन जोडून देणेत यावे, त्यानंतर होणा-या विलंबास महावितरण आयोगाच्या नियमावलीनुसार दंडास पात्र राहील.**

**३) वीज कनेक्शन दिल्यानंतर पुर्तता अहवाल मंचाकडे पंधरा दिवसात सादर करावा.**

**४) या आदेशाविरुध्द ग्राहकांस अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात दाखल करता येईल.**

**पत्ता :-**

**सचिव,**
**लोकपाल महाराष्ट्र राज्य**
**विदयुत नियमक आयोग**
**६०६/६०८ केशवा बिल्डींग/**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुंबई ४०००५१**
**फोन नं. ०२२ / २६५२९६५**

**श्री. डी. एस्. जामखेडकर**
**अध्यक्ष**
**ग्रातनिमं कोकण परिमंडल रत्नागिरी**

**श्री. व्हि.बी.जगताप**
**कार्यकारी अभियंता व सचिव**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल रत्नागिरी**

**दिनांक :- २४.०७.२०१३.**
**ठिकाण :- रत्नागिरी**